# नागरिकांमध्ये जबाबदारीची जाणीव वाढवण्याचे प्रेरक पाऊल- जगताप

## प्रभाग क्र. १३ मध्ये स्वखर्चाने स्वच्छता मोहीम

**अहमदनगर । रयत समाचार**

प्रभाग क्रमांक १३ मध्ये सणासुदीच्या काळात नागरिकांच्या आरोग्यासाठी महत्त्वाची स्वच्छता मोहीम माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले आणि माजी नगरसेवक विपुल शेटीया यांच्या पुढाकाराने स्वखर्चाने राबविली गेली. मोहिमेचा शुभारंभ आनंदधाम येथे करण्यात आला. कार्यक्रमास उपस्थित होते: सचिन जगताप, लक्ष्मीकांत जाजू, अशोक कोठारी, बाबूशेठ लोढा, अतुल गुगळे, संदीप गुगळे, दिलीप बोरा, सतीश चोपडा, जितुशेठ पोरवाल सहित अनेक नागरिक आणि सामाजिक नेते. ही मोहीम प्रत्येक कॉलनी, गल्ली आणि वस्तीत राबवली जाणार असून, नागरिकांनी स्वच्छतेसाठी प्रशासनाची वाट न पाहता स्वतः पुढाकार घ्यावा, असे आवाहन नगरसेवकांनी केले. अनेक ठिकाणी घंटागाडी वेळेवर न येणे, कचऱ्याचे ढीग, दुर्गंधी यामुळे समस्या निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात बोलताना सचिन जगताप म्हणाले, ''स्वच्छतेसाठी वेळ, श्रम आणि पैशाची गुंतवणूक करणे



### अविनाश घुले व विपुल शेटीयांचा पुढाकार

समाजासाठी मोठी सकारात्मक पावले आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक जेव्हा एकत्र येतात, तेव्हा परिसराचा विकास अधिक वेगाने होतो. अशा प्रयत्नांतून प्रभागाचा चेहरामोहरा नक्की बदलत जाईल.

अविनाश घुले यांनी सांगितले, ''स्वच्छता ही केवळ शासकीय यंत्रणांची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामाजिक बांधिलकी आहे. प्रशासनाच्या आशेवर न राहता आपणच एकत्र येऊन बदल घडवू शकतो. ही मोहीम सातत्याने चालू राहणार आहे.''

विपुल शेटिया यांनीही नागरिकांना प्रेरित करत म्हटले, ''केवळ तक्रार करून काही होणार नाही. हातात झाडू घेऊन स्वच्छता केली, तर इतरांनाही प्रेरणा मिळेल. स्वच्छता ही केवळ अभियान नाही, ती आपल्या संस्कृतीचा भाग व्हायला हवी.'' ही स्वच्छता मोहीम स्थानिक नेतृत्वाच्या खिशातून सुरू केली गेली असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत कार्यक्रमाचे स्वागत केले. पुढील टप्प्यात प्रत्यक्ष स्वच्छतेचे काम, जनजागृती आणि नागरिकांच्या समस्या ऐकणे यावर भर दिला जाणार आहे.



# ओंकारनगर शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा

**अहमदनगर । रयत समाचार**

केडगाव येथील महानगरपालिकेच्या प्रथम आयएसओ मानांकन प्राप्त ओंकारनगर प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन व जागतिक हात धुवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.भारतरत्न, मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना जयंतीनिमित्त यावेळी अभिवादन करण्यात आले. सहशिक्षक शिवराज वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली.

श्रमप्रतिष्ठा व सतत वाचनाचा व्यासंग असेल तर आपण जीवनात उंच शिखरावर जाऊन पोहचतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम असे ते म्हणाले. मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी विद्यार्थ्यांना जागतिक हात धुवा दिनाच्या निमित्ताने हात धुण्याच्या सप्तपदीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांनी अवांतर वाचन करत वाचनाचा संकल्प केला. सहशिक्षिका वृषाली गावडे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे फायदे समजावून सांगितले. तसेच वाचन संस्कृती जपण्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी ॲड. विजय महाजन, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे उपस्थित होत्या.



# विजेच्या लपंडावामुळे केडगावमध्ये पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर

## सणासुदीच्या काळात नागरिक त्रस्त

**अहमदनगर । रयत समाचार**

सणासुदीच्या काळात केडगाव उपनगरात विजेच्या लपंडावामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून नागरिकांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दिवाळीसारख्या प्रकाशोत्सवाच्या काळात पाण्याचा तुटवडा निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महापालिका स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी महावितरण कार्यालयावर जोरदार टीका करत तातडीने पाणीपुरवठा आणि विजेचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे. महावितरण कार्यालयाकडून नागरिकांना पूर्वसूचना न देता वारंवार वीजपुरवठा खंडित केला जात आहे. मुळा धरण, विळद व नागपूर येथील वितरण व्यवस्थेतली अडचण यामुळे केडगाव उपनगराचा पाणीपुरवठा ठप्प झाला आहे. काही मिनिटांच्या वीज बंदीमुळे पाणीपुरवठा दोन ते चार दिवस पुढे ढकलला जातो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीमुळे बाजारपेठेतील व्यापारी, सामान्य नागरिक तसेच विद्यार्थी सुद्धा अडचणीत आहेत. दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणात पाण्याची कमतरता झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. मनोज कोतकर यांनी शहर उपअभियंता चव्हाण यांना निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. त्यांनी म्हटले, ''देखभाल आणि दुरुस्तीच्या नावाखाली भारनियमन करणे योग्य नाही. सणासुदीच्या काळात महावितरणने नागरिकांना दिलासा द्यावा. दिवाळी हा प्रकाशाचा सण असून या काळातच विजेचा पुरवठा खंडित करणे म्हणजे नागरिकांच्या आनंदात व्यत्यय आणणे आहे.'' निवेदनात असेही म्हटले आहे की, केडगावसारख्या मोठ्या उपनगरात वारंवार वीजपुरवठा खंडित होणे आणि पाणीटंचाई निर्माण होणे प्रशासनाच्या निष्क्रियतेचे द्योतक आहे. नागरिकांनीही महावितरणला जबाबदार धरून स्थिर वीजपुरवठा राखावा, अशी मागणी व्यक्त केली आहे.

# सरस्वती कला वंदना व शब्द-सूर वैजयंतीचे गुरुवारी आयोजन

**अहमदनगर । आबीद खान**

येथील श्रीगोपाल रामनाथ धूत फौंडेशन व नादब्रह्म संगीतालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, ता. १६ ऑक्टोबर रोजी सरस्वती कला वंदना उपक्रम आणि शब्द-सूर वैजयंती संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. सरस्वती कला वंदना उपक्रमात संगीत कलेतील (गायक, वादक, संगीतकार व नर्तक) तसेच साहित्य, लोककला, नाट्य, चित्रपट, चित्र, शिल्प व संस्था यांसारख्या विविध क्षेत्रातील निवडक गुणी कला साधकांचे प्रणामपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे. विशेष संयोजन समिती स्थापन करून एकूण ३०० ते ३५० कलाकार सन्मानित केले जातील. शब्द-सूर वैजयंती ही संगीत मैफल माऊली सभागृहात सायंकाळी ७ ते ९ या वेळेत पार पडेल. मैफलीतअ A ते C रांगा विशेष अतिथींसाठी तर D ते H रांगा सन्मानीत कला साधकांसाठी राखीव असतील. बाकी आसनव्यवस्था सर्व रसिकांसाठी खुली व विनामूल्य असून, ''प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य'' या तत्त्वावर ठेवण्यात आले आहे. धूत फौंडेशनच्या प्रतिभा, वैशाली व अनुराग धूत यांनी सांगितले की, कलावंतांना सन्मानित करणे हा संगीत प्रसार व प्रचाराचा मुख्य हेतू आहे. तसेच, नादब्रह्मचे पवन नाईक यांनी सांगितले की, संगीत मैफल आयोजित करून दर्जेदार कला व कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा उद्देश आहे. फौंडेशनचे सर्वेसर्वा अनुराग व श्रीगोपाल धूत यांनी नगरकर रसिकांसाठी हा विशेष उपक्रम असून, कला सन्मान व मैफलीतून संगीत मंच या दोन हेतू साध्य होत असल्याचे सांगितले. परितोष व सूरूची धूत-मोहत यांनी सर्व कलाकार व रसिकांना सरस्वती कला वंदना उपक्रम व शब्द-सूर वैजयंती या मैफलीस विशेष प्रतिसाद देण्याचे नम्र आवाहन केले आहे. रयत समाचार



# स्व. शंकरराव घुले माथाडी कामगार पतसंस्थेतील सभासदांना १५ टक्के लाभांश वाटप

## सर्वांची दिवाळी गोड झाली पाहिजे- अविनाश घुले

**अहमदनगर । रयत समाचार**

स्व. शंकरराव घुले माथाडी कामगार पतसंस्थेच्या सभासदांचे योगदान मोलाचे आहे. पतसंस्थेच्या माध्यमातून त्यांच्या कुटुंबांचे जीवनमान उंचावले पाहिजे, सर्वांची दिवाळी आनंदाने साजरी व्हावी, यासाठी संस्था प्रयत्नशील आहे, असे हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी सांगितले. या वर्षी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना १५ टक्के लाभांश वाटप करण्यात आले. कार्यक्रमास हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, चेअरमन रवींद्र भोसले, व्हाईस चेअरमन नवनाथ बडे, सचिव बबनराव सुसे, संचालक आदिनाथ चेके, लक्ष्मण वायभासे, रत्नाबाई आजबे, उपाध्यक्ष गोविंदराव सांगळे, तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. अविनाश घुले म्हणाले, ''पतसंस्था ही केवळ आर्थिक मदत करणारी संस्था नसून, सभासदांच्या हक्कांचे रक्षण करणारी यंत्रणा आहे. सभासदांनी संस्था मजबूत ठेवण्यासाठी एकत्र राहावे. भविष्यात आणखी लाभ मिळावेत यासाठी सर्वांनी योगदान द्यावे.'' चेअरमन रवींद्र भोसले यांनी सांगितले की, ''सभासदांच्या विश्वासामुळे संस्था सक्षम झाली आहे. संचालक मंडळाच्या सहकार्यामुळे यंदा १५ टक्के लाभांश देणे शक्य झाले आहे. सभासदांचे हित हेच आमचे मुख्य ध्येय आहे.'' या कार्यक्रमाद्वारे पतसंस्थेच्या सर्व पात्र सभासदांना लाभांश वितरित करण्यात आला. सभासदांनी या उपक्रमाचे स्वागत केले आणि समाधान व्यक्त केले.

# भिंगारला डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक स्मारक उभारण्याची मागणी

## उपमुख्यमंत्री पवार यांना रिपाइं (आठवले) युवक जिल्हाध्यक्ष काळे यांचे निवेदन

**भिंगार । रयत समाचार**

अहिल्यानगर कॅन्टोन्मेंट बोर्ड, भिंगार येथील कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हॉस्पिटल आवारात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सार्वजनिक स्मारक उभारावे, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) युवकचे जिल्हाध्यक्ष अमित काळे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.



मुंबई येथे झालेल्या भेटीत आमदार संग्राम जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत अमित काळे यांनी उपमुख्यमंत्री पवार यांना निवेदन देऊन हा मुद्दा मांडला. या वेळी आंबेडकरी चळवळीचे नेते अशोक गायकवाड, भीमराव पगारे, सुरेश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने भिंगार भूमी पावन झाली आहे. येथील कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हॉस्पिटलला आंबेडकरी कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण मागणीमुळे आणि स्थानिक नागरिकांच्या भावनिक आवाहनानंतर ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॅन्टोन्मेंट जनरल हॉस्पिटल'' असे नाव देण्यात आले आहे. सध्या हॉस्पिटल परिसरात डॉ. आंबेडकरांचा अर्धाकृती पुतळा आणि प्रतिमा आहेत, परंतु त्या जागेचा परिसर अत्यंत लहान असल्याने अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांना अडचणींना सामोरे जावे लागते, असेही निवेदनात नमूद आहे. हॉस्पिटल आवारात मोठी मोकळी जागा उपलब्ध असून ती स्मारकासाठी योग्य असल्याचे अमित काळे यांनी स्पष्ट केले. भिंगारवासीयांचे या ठिकाणाशी भावनिक नाते असून, येथे प्रशस्त, आकर्षक आणि भव्य सार्वजनिक स्मारक उभारल्यास भिंगार शहराच्या सौंदर्यात भर पडेल, असा विश्वास भिंगारकरांच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

# मखदूम सोसायटी व रहेमत सुलतान फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना शिक्षणाची बियाणे

## ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्त मोफत वह्यांचे वाटप



**अहमदनगर । रयत समाचार**

भारताचे माजी राष्ट्रपती आणि 'भारताचे मिसाइल मॅन' म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती निमित्त मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दर्गा दायरा येथे मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम इंडिया बेकर्स, अल करम सोसायटी आदींच्या सहकार्याने पार पडला. या प्रसंगी रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे सहसचिव डॉ. कमर सुरुर, शाळेचे मुख्याध्यापक फैय्याज शेख आदी मान्यवर उपस्थित होते. युनुसभाई तांबटकर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले, ''श्रीमंती, सौंदर्य किंवा ओळख या सगळ्यांपेक्षा मोठी गोष्ट म्हणजे शिक्षण आणि संस्कार आहे. तुमच्याकडूनच पुढचं समाजाचं भविष्य घडणार आहे. त्यामुळे अभ्यास करा, फक्त गुण मिळवण्यासाठी नव्हे, तर समाजासाठी काही करण्यासाठी.'' डॉ. कमर सुरुर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार मांडत शिक्षणाचे महत्त्व, अभ्यासाची पद्धत आणि डॉ. कलाम यांच्या आयुष्याचा आदर्श कसा घ्यावा याविषयी मार्गदर्शन केले. शाळेच्या शिक्षिका शेख शाकेरा यांनी प्रास्ताविक करून वर्षभर शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नसीम शेख यांनी केले, तर आभार प्रदर्शन शेख ताहेरा यांनी केले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?
CASH COUNTER
अधिक माहितीसाठी संपर्क
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# कारखान्याचा ५१ वा गाळप हंगाम उत्साहात, बॉयलर अग्नीप्रदीपन साधेपणात पार

## नागवडे साखर कारखान्याचे सुमारे १४ कोटी रुपयांचे पेमेंट बँकेत वर्ग

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याने सन २०२४२५ मधील उसाचे प्रोत्साहनपर अनुदान, कामगारांचा पगार आणि बोनस यासाठीची सुमारे १४ कोटी रुपयांची रक्कम दिनांक १३ ऑक्टोबर रोजी बँकेत वर्ग करून सभासद शेतकऱ्यांना दिलेल्या शब्दाची पूर्तता केली असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांनी केले. सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचा सन २०२५२६ चा ५१ वा गाळप हंगाम सुरू करण्याचा बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभ मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी साध्या पण उत्साही वातावरणात पार पडला. या वेळी राजेंद्रदादा नागवडे म्हणाले की, ''नागवडे कारखाना ऊसभावात कधीही मागे राहिलेला नाही आणि भविष्यातही राहणार नाही. सर्वसामान्य शेतकरी आणि ऊस उत्पादक यांचा स्वाभिमान टिकविण्यासाठी तसेच योग्य न्याय मिळावा यासाठी सहकारी साखर कारखानदारी



जिवंत राहणे अत्यावश्यक आहे.'' ते पुढे म्हणाले, ''आपले पूर्वज खाजगी कारखानदारीत भरडले गेले. पण स्व. शिवाजीराव बापू नागवडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जीवाचे रान करून हा सहकारी कारखाना उभा केला. त्यामुळे सर्वांची प्रगती झाली. आज पुन्हा खाजगीकरणाचा वेढा वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळवायचा असेल, तर सहकारी साखर कारखानदारी जिवंत ठेवणे आवश्यक आहे.'' कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब भोस म्हणाले की, ''स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांच्या अथक परिश्रमातून उभा राहिलेला हा कारखाना आज राजेंद्रदादा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली सक्षमपणे उभा आहे. सभासद शेतकऱ्यांनी आपला ऊस आपल्या कारखान्यास गाळपासाठी द्यावा.'' या वेळी साखर कामगार महासंघाचे सरचिटणीस कॉ. आनंदराव वायकर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. रोहिणी वायकर यांच्या शुभहस्ते बॉयलरची विधिवत पूजा करण्यात आली. कार्यक्रमास कारखान्याचे संचालक श्रीनिवास घाटगे, राकेश पाचपुते, योगेश भोईटे, शरद जगताप, भाऊसाहेब नेटके, प्रा. सुरेश रसाळ, लक्ष्मण रायकर, प्रवीण लबडे, विश्वनाथ गिरमकर, बंडू जगताप, संदीप औटी, मारुती पाचपुते, भाऊसाहेब बरकडे, प्रशांत शिपलकर, दत्तोबा कातोरे, ज्ञानदेव खरात, कामगार युनियनचे अध्यक्ष रामभाऊ लबडे, तसेच सामाजिक कार्यकर्ते प्रवीण शिर्के, सुरेश पवार, नानासाहेब जंगले, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे आणि सर्व खातेप्रमुख व कामगार उपस्थित होते. राजेंद्रदादा नागवडे यांची डिस्टिलरी असोसिएशनच्या संचालकपदी तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल कामगार संघटनेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत, सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक संचालक सुभाष शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संचालक सावता हिरवे यांनी केले. **रयत समाचार**

# नागरदेवळे गट व गणातील मतदार यादीत गोंधळ

## गंभीर त्रुटींवर हरकती दाखल

**अहमदनगर । रयत समाचार**

नगर तालुक्यातील नागरदेवळे जिल्हा परिषद गट आणि गण मध्ये मतदार यादीतील गंभीर त्रुटींमुळे लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. याबाबत निखील शेलार, मुकेश झोडगे, सागर खरपुडे, राहुल शिंदे, महेश बोरुडे आणि किरण शेलार यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन लेखी तक्रार दाखल केली आहे. नागरदेवळे, वडारवाडी, बुऱ्हाणनगर आणि परिसरातील अनेक गावांमध्ये हजारो मतदारांची नावे चुकीची, दुबार आणि मयत व्यक्तींची कायम असल्याचे पुराव्यासह नमूद करून त्यांनी हरकती नोंदविल्या आहेत. नागरदेवळे जिल्हा परिषद गट क्र. ४८, पंचायत समिती गण क्र. ९५ आणि केतकी गण क्र. ९६ च्या प्रारूप मतदार यादीत मोठ्या प्रमाणात गोंधळ असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक मतदारांच्या घर क्रमांकांच्या ठिकाणी ओ, एनए, पीएमटी अशा चुकीच्या नोंदी दिसून येत आहेत. तहसील कार्यालयात निवडणूक अधिकारी व तहसीलदार अभिजीत वांढेकर यांच्याकडे या संदर्भात लेखी हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. तक्रारदारांनी सांगितले की, नागरदेवळे जिल्हा परिषद मतदार यादीत सुमारे २,६७१ मतदारांची नावे दुबार आढळली असून ही नावे दोन्ही गटांमध्ये जेऊर



आणि नागरदेवळे येथे नोंदवली गेली आहेत. त्यामुळे मतदानाच्या वेळी दुबार मतदानाची शक्यता निर्माण होऊ शकते. तसेच पंचायत समिती गण ९५ व केतकी गण ९६ च्या प्रारूप यादीत १,६३१ दुबार नावे असल्याचे निदर्शनास आले आहे. तक्रारदारांनी या सर्व यादींचे सखोल सर्वेक्षण, पुनर्तपासणी आणि योग्य ती सुधारणा करण्याची मागणी केली आहे. मतदार याद्यांतील त्रुटी दूर न झाल्यास आगामी निवडणुकांची पारदर्शकता धोक्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. ते म्हणाले की, संविधानाचे पावित्र्य राखण्यासाठी, उमेदवार आणि मतदारांची फसवणूक टाळण्यासाठी, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून चौकशी करावी. प्रशासनाने तातडीने सखोल तपासणी करून जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी आणि पारदर्शी मतदार यादी तयार करण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, असेही तक्रारदारांचे म्हणणे आहे.





# पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी दिले अजून एका पामरास नवजीवन

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी पोलीस ठाण्याचे निरीक्षक विलास पुजारी यांनी अजून एका पामरास नवजीवन देऊन ते मानवतेचेही पुजारी असल्याचे अधोरेखीत केले आहे. पाथर्डी तालुक्यातील साकेगाव येथे अनेक महिन्यांपासून बस थांब्याच्या शेडमध्ये बेवारस अवस्थेत जीवन कंठत असलेल्या भास्कर सुभाना बळीद या ७० वर्षे वयाच्या वृद्धास स्नेहालय संस्थेकडे सुपूर्द केले.

मागील पंधरवड्यातही शेवगाव-पाथर्डी रस्त्यावर बेवारस अवस्थेत अनेक महिने ठाण मांडून बसलेल्या एका इसमास उचलून त्याची सुश्रुषा करत पुजारी यांनी त्याला नवजीवन दिले होते. त्यानंतर अशा बेवारस अवस्थेत आढळत असलेल्या पामरांची माहिती त्यांच्याकडे येऊ लागली. नागरिकांकडून माहिती मिळताच मानवतेप्रती संवेदनशील असलेले पोलीस निरीक्षक विलास पुजारी हे तत्परतेने घटनास्थळी जाऊन त्यांना पोलीस ठाण्यात घेऊन येतात आणि योग्य ते कायदेशीर सोपस्कार पार पाडून त्यांना योग्य त्या ठिकाणी पाठवत आहेत. आज मंगळवारी त्यांना साकेगाव येथील बस थांब्याच्या शेडमध्ये अनेक महिन्यांपासून बेवारस अवस्थेत ठाण मांडून बसलेल्या ७० वर्षे वयाच्या वृद्धाची माहिती मिळताच ते त्यांचे अधीनस्थ सहकारी पोलीस कॉंस्टेबल अमोल जवरे, राहुल घोडके आणि श्याम बनकर यांना सोबतीला घेऊन घटनास्थळी पोहोचले. त्याची कौटुंबिक माहिती घेऊन त्यांनी त्याला पोलीस व्हॅनमध्ये बसवून पोलीस ठाण्यात आणले.

वाहतूक पोलीस नाईक अल्ताफ शेख यांनी स्वखर्चाने सदर इसमास नवा पोशाख घेऊन दिला. सदर इसमास कुणीही जवळचे नातेवाईक नाहीत. दूरचे आहेत परंतु ते मुंबई येथे स्थायिक झाले आहेत. त्यामुळे, पुजारी यांनी त्याला वाऱ्यावर सोडून न देता मानवतेचा आदर्श घालून देत पोलीस ठाण्यात आणले. त्याला पचेल तितका आहार देऊन कायदेशीर सोपस्कार पार पाडून स्नेहालय संस्थेकडे सुपूर्द करण्यात येणार असल्याची माहिती श्री पुजारी यांनी दिली. महिन्याभराच्या अंतरात पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी दोन बेवारस पामरांना नवजीवन देऊन ते मानवतेचेही पुजारी असल्याचे अधोरेखीत केले आहे. त्यांच्या संवेदनशीलतेचे शहरातील सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. **रयत समाचार**

# नगराध्यक्षपदासह सर्व प्रभागांत समाजवादीचे उमेदवार-जमादार

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर नगरपालिका निवडणुकीत समाजवादी पार्टी संपूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरणार असून नगराध्यक्ष पदासह सर्वच प्रभागांमध्ये पक्षाचे स्वतंत्र उमेदवार रिंगणात उतरवले जाणार असल्याची घोषणा जिल्हाध्यक्ष जोएफ जमादार यांनी केली. शहराच्या विकासाला नवी दिशा देणे हेच आमचे ध्येय असल्याचे सांगून जमादार म्हणाले की, ''गेल्या चार वर्षांपासून नगरपालिकेवर प्रशासक राजवट आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे प्रशासनाने पूर्णतः दुर्लक्ष केले आहे. विकासकामे ठप्प आहेत. नागरिकांना आजही नळांमधून येणारे मलमिश्रित पाणी प्यावे लागत आहे. रस्त्यांची अवस्था दयनीय असून नालेसफाई होत नाही. स्वच्छतेअभावी नागरिक त्रस्त आहेत.'' ते पुढे म्हणाले, ''आजी-माजी लोकप्रतिनिधींनी या प्रश्नांवर कधीच ठोस भूमिका घेतली नाही. ते फक्त निवडणुकीच्या काळातच जागे होतात. परंतु समाजवादी पार्टीने लोकांच्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून लढा दिला आहे आणि पुढेही देत राहील.'' जमादार यांनी सांगितले की, समाजवादी पार्टी गेल्या काही वर्षांपासून



श्रीरामपूर शहरात संघटनात्मक पातळीवर सक्रिय आहे. पक्ष युवक, महिला आणि कामगार वर्गाशी सातत्याने संपर्कात राहून पाणीटंचाई, स्वच्छता, रस्ते, घरकुल, आरोग्य आणि शिक्षणासारख्या नागरी प्रश्नांवर ठाम भूमिका मांडत आला आहे. ''या पार्श्वभूमीवर येणाऱ्या निवडणुकीत पक्षाने स्वतंत्रपणे उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला आहे. आमचा उद्देश केवळ सत्ता मिळवणे नाही, तर सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणे आणि त्यांचा आवाज सत्तेपर्यंत पोहोचवणे हा आहे,'' असेही ते म्हणाले.आगामी काळात पक्षाच्या उमेदवार निवड प्रक्रियेला प्रारंभ होणार असून प्रत्येक प्रभागातून लोकाभिमुख, स्वच्छ प्रतिमेचे आणि कार्यक्षम उमेदवार उभे करण्यावर भर दिला जाईल, अशी माहिती जमादार यांनी दिली. ''सत्तेत आल्यास श्रीरामपूरला स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि प्रगतिशील शहर बनवू. शहरातील पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, आरोग्यसेवा आणि पायाभूत सुविधा या सर्व प्रश्नांवर ठोस कृती आराखडा तयार करण्यात येईल,'' असेही त्यांनी स्पष्ट केले. **रयत समाचार**

# बोधेगाव गटात पूर्ण ताकदीने लढणार- पठाण

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्वाचा मानला जाणारा बोधेगाव जिल्हा परिषद गट यंदा सर्वसाधारण खुला प्रवर्गाचा झाल्याने या गटातील राजकीय समीकरणे नव्याने आकार घेत आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस फिरोजभाई पठाण यांची या गटातून उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यांनी पक्षाचे प्रमुख शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बोधेगाव गटाची निवडणूक पूर्ण ताकदीने लढवणार असल्याची माहिती प्रतिनिधीशी बोलताना दिली. फिरोजभाई पठाण म्हणाले की, गेल्या काही वर्षांपासून ते या परिसरातील सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रात कार्यरत आहेत. शेतकरी,



व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला आहे. या भागातील सर्व समाज बांधवांचा पाठिंबा असून, पक्षाच्या माध्यमातून बोधेगाव गटात त्यांचा मजबूत आणि दांडगा जनसंपर्क आहे. बोधेगाव गट खुला प्रवर्गाचा झाल्यामुळे अनेक इच्छुकांची चढाओढ सुरू झाली आहे. फिरोजभाई पठाण यांच्या उमेदवारीमुळे या गटातील निवडणुकीत नव्या राजकीय समीकरणांची निर्मिती होणार असून, स्थानिक राजकारणात चैतन्य निर्माण झाले आहे. तरुण वर्ग व विविध समाजघटकांमध्ये त्यांना मिळणारा पाठिंबा लक्षवेधी ठरत असून, या गटातील निवडणुकीची लढत अधिक रोचक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. **रयत समाचार**

# आदर्श विद्यालयात आकाश कंदिल स्पर्धा

## ९०० विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनई येथील आदर्श विद्यालय प्राथमिक शाळेत दिवाळी सणानिमित्ताने विद्यार्थ्यांनी घरी बनवलेली कंदिल सादर करण्याची ''आकाश कंदिल स्पर्धा'' मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विद्यालयातील ९०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी घरगुती, पेपर, कार्डबोर्ड, पेपर कप यांसारख्या विविध साहित्यांचा उपयोग करून सुंदर आणि नाविन्यपूर्ण आकाश कंदिल तयार केली. ते चौथीपर्यंतच्या वर्गांमध्ये प्रथम पाच क्रमांक जाहीर करण्यात आले. कार्यक्रमाचे निरीक्षण संस्थेच्या अध्यक्षा जयश्री गडाख आणि सचिव रविराज तुकाराम गडाख यांनी



केले. अध्यक्षा गडाख यांनी सांगितले की, चित्रकला, निबंध, खेळ, वर्गसजावट, हस्तलिखित रंगभरण, वर्तमानपत्र वाचन यांसारखे विविध उपक्रम राबवून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विद्यालय नाविन्यपूर्ण पद्धतीने प्रयत्नशील आहे. तसेच, ग्रामीण भागात हिंदू सणांचे महत्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक फोपसे डी.यू. उपस्थित होते. तसेच, डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ''वाचन प्रेरणा दिवस'', वृत्तपत्र विक्रेता दिन आणि ''जागतिक हात धुवा दिन'' देखील साजरे करण्यात आले. स्पर्धेचे नियोजन दरंदले ए.बी. यांच्या मार्गदर्शनाखाली झाले, तर शिक्षक घावटे ए.आर. यांनी आभार प्रदर्शन केले. पालक वर्गाने या वेगळ्या उपक्रमाचे कौतुक केले आहे. **रयत समाचार**

# मोबाईलवर फिरणारी बोटे, पुस्तकांच्या पानावर फिरायला हवीत- प्रा. डॉ. चौरे

**पाथर्डी । नितीन गटाणी**

बाबुजी आव्हाड महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. चौरे म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्याने व्यक्तिमत्व विकास, मनोरंजन, अभ्यास आणि करिअर घडविण्यासाठी पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. ''आज मोबाईलच्या स्क्रीनवर फिरणारी बोटे पुस्तकांच्या पानांवर फिरायला हवीत. प्रत्येक पुस्तकाला एक सुगंध असून पुस्तके आपल्याला आनंद देतात.'' त्यांनी सांगितले की, भारतामध्ये दोन




असे राष्ट्रपती होऊन गेले की त्यांचा वाढदिवस प्रेरक दिन म्हणून साजरा केला जातो डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन आणि डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून. डॉ. कलाम हे २००२ मध्ये भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून निवडून आले आणि ते जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे नेतृत्व करणारे पहिले शास्त्रज्ञ होते. राष्ट्रपतीपदाच्या कार्यकाळानंतर त्यांनी शिक्षण, लेखन, वाचन आणि सार्वजनिक सेवेत सक्रिय सहभाग घेतला. डॉ. चौरे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, आज सोशल मिडीयाच्या अतिवापरामुळे मुलांचे वाचन कमी होत चालले आहे. सोशल मिडीयावरील साहित्य खूप वरवरचे असून खरे ज्ञान मिळवायचे असेल तर पुस्तकांचे वाचन अत्यंत महत्वाचे आहे. ''प्रत्येकाने पुस्तकांच्या पात्रांशी एकरूप व्हायला हवे. भविष्यातील शिक्षण अभासी स्वरूपाचे होऊ शकते, त्यामध्ये शिक्षक आणि पुस्तके दोघांनाही थारा नसेल,'' अशी भीती त्यांनी व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांसाठी पुस्तक परीक्षण स्पर्धा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शेखर ससाणे, सूत्रसंचालन प्रा. आशा पालवे यांनी तर आभार डॉ. किरण गुलदगड यांनी मानले. **रयत समाचार**

# श्रीनिवास नाईक यांची येळपणे जिल्हा परिषद गटातून उमेदवारीची तयारी

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आरक्षण सोडतीनंतर उमेदवारांच्या हालचालींना वेग आला असून येळपणे जिल्हा परिषद गटातून महाविकास आघाडीकडून शरदचंद्र पवार पक्षाच्या तुतारी चिन्हावर निवडणूक लढवण्याची तयारी श्रीनिवास श्रीधर नाईक यांनी सुरू केली आहे. खासदार निलेश लंके, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, वरिष्ठ नेते बाबासाहेब भोस तसेच तालुका अध्यक्ष हरिदास शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली नाईक हे निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत. गेल्या २५ वर्षांपासून राजकारणात सक्रिय असलेले श्रीनिवास नाईक यांनी येळपणे जिल्हा परिषद गटातील विविध गावांमध्ये रस्ते, पूल, बंधारे, ऊर्जा विभागातील डीपी बसविणे, मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ मिळवून देणे आदी अनेक विकासकामांमध्ये मोलाची भूमिका बजावली आहे. मंत्रालयातून अनेक प्रलंबित विकासकामांना त्यांनी गती मिळवून दिली असून प्रत्येक गावात त्यांचा विस्तृत मित्रपरिवार आणि सामाजिक संपर्क आहे. पत्रकारांशी बोलताना नाईक म्हणाले, ''मी २० वर्षांपूर्वी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता, मात्र ज्येष्ठ नेते अण्णा पाटील पवार यांच्या साठी मी त्यावेळी थांबलो. आता मात्र जनतेच्या पाठिंब्याने निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. **रयत समाचार**

# डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पुरस्कार नाहीच

जागतिक पातळीवर सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या नोबेल पुरस्काराची घोषणा दरवर्षी ऑक्टोबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात केली जाते. मानव कल्याणासाठी झटणाऱ्या विविध क्षेत्रातील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक आणि जागतिक पातळीवर शांततेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेस हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी या पुरस्काराकडे सगळ्या जगाचे लक्ष लागले होते कारण यावर्षीचा शांततेचा नोबेल पुरस्कार मलाच मिळणार असा ( फाजील ) आत्मविश्वास अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना होता. तसे त्यांनी अनेकदा बोलूनही दाखवले होते त्यामुळे त्यांना खरंच हा पुरस्कार मिळेल का? याची उत्सुकता जगभर होती. शांततेच्या नोबेल पुरस्काराची घोषणा शुक्रवारी दहा ऑक्टोबरला झाली आणि त्यावरील सस्पेन्स संपला. शांततेचा नोबेल पुरस्कार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मिळालाच नाही. यावर्षीचा शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला तो व्हेनेझुएलाच्या मारिया कोरिना मचाडो यांना आणि मचाडो यांना पुरस्कार का मिळाला यापेक्षा ट्रम्प यांना पुरस्कार का मिळाला नाही याचीच जगभर याची चर्चा झाली. डोनाल्ड ट्रम्प यांनी हा पुरस्कार मलाच मिळणार यासाठी मी सात युद्धे थांबवली व जगात शांती निर्माण केली अशी सातत्याने वल्गना करून एकप्रकारे नोबेल पुरस्कार समितीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या दबावाला नोबेल पुरस्कार समिती बळी पडली नाही. त्यांनी योग्य निर्णय घेत डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार नाकारीत योग्य व्यक्तीला पुरस्कार दिला याबद्दल नोबेल पुरस्कार समितीचे कौतुकच करायला हवे. डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार हवा होता त्यासाठी त्यांनी मोठा थयथयाट केला. सातत्याने मी सात युद्धे थांबवली अशी वल्गना केली मात्र अमेरिकेनेच अनेक देशांना फुस लावून युद्धाच्या गर्तेत ढकलले हे लपून राहिले नाही. आधी भांडण लावून देणे आणि नंतर ते सोडवण्याचे नाटक करणे त्यातून आपला स्वार्थ साधणे हेच अमेरिकेचे धोरण आहे. डोनाल्ड ट्रम्प असो की अमेरिकेचे याआधीचे राष्ट्राध्यक्ष त्यांनी इतर देशांकडे फक्त आपल्या शस्त्रास्त्रांचे गिऱ्हाईक म्हणून पाहिले. आपली शस्त्रास्त्रे विकली जावीत यासाठी अमेरिकेने अनेक देशात युद्ध पेटवली हा इतिहास आहे. आता हेच पाहा ना... भारत पाकिस्तानचे युद्ध मीच थांबवले अशी शेखी मिरवणारे व त्याद्वारे नोबेल पुरस्कारावर हक्क सांगणारे डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तानला घातक शस्त्रात विकणार असल्याची बातमी नुकतीच वर्तमानपत्रात वाचली आता. जर डोनाल्ड ट्रम्प हे खरंच शांततेचे भोक्ते असते तर त्यांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्रे का विकली असती ? पाकिस्तान या शस्त्रांचा वापर भारताविरोधात करणार जर पाकिस्तानने हे शस्त्र भारताविरुद्ध वापरले तर भारतही त्याला उत्तर देणार मग पुन्हा संघर्ष उफाळणार. जर ही शस्त्रे दहशतवाद्यांच्या हातात पडली तर भारतासोबतच संपूर्ण जगाला धोका पसरू शकतो. मग पाकिस्तानसारख्या दहशतवादी देशांना शस्त्रे विकून जगभर अशांतता पसरवणाऱ्या ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार कसा मिळणार ? म्हणूनच नोबेल पुरस्कार समितीने घेतलेला हा निर्णय अतिशय योग्य आहे. ज्या मारिया माचाडो यांना हा पुरस्कार देण्यात आला त्या त्याच्या हकदार होत्याच. मारिया मचाडो या हॉवर्ड विद्यापीठातील पदवीधर आहेत आणि त्यांच्या व्हेनेझुएला देशातील हुकुमशाही विरुद्ध त्यांनी आवाज उठवला आहे. भ्रष्ट हुकुमशाही विरुद्ध स्वतःचा जीव धोक्यात घालून लढणाऱ्या मारिया मचाडो या लोकशाहीचा आवाज आहेत. मागील वर्षी या देशात निवडणुका झाल्या. या निवडणुकीत मचाडो या उभ्या राहिल्या मात्र त्यांना निवडणुकीत उभे राहण्यापासून रोखण्यात आले. त्यांना अपात्र घोषित करून त्यांचे राजकारण संपवण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण त्या सरकारच्या या दमनशाहिला दबल्या नाहीत. त्यांनी या विरोधात आवाज उठवला. संपूर्ण देशाला हुकुमशाही विरुद्ध एकत्र केले. देशात लोकशाही टिकावी म्हणून जीव धोक्यात घालून लढल्या त्यामुळेच त्यांची या पुरस्कारासाठी झालेली निवड सर्वार्थाने योग्य आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि मारिया मचाडो यांची तुलना होऊ शकत नाही. लोकशाहीच्या नावाखाली हुकुमशाही राबवणारे ट्रम्प या पुरस्कारासाठी पात्र ठरूच शकत नाही म्हणूनच नोबेल पुरस्कार समितीच्या या निर्णयाचे जगभर कौतुक होत आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# खातगाव-इसळक रस्ता दुरुस्तीस सुरुवात

## ग्रामस्थांच्या ठिय्या आंदोलनानंतर प्रशासन जागे

**नगर तालुका । रयत समाचार**

खातगाव- इसळक या अर्धवट रस्त्याचे काम मार्गी लावावे, या मागणीसाठी आज प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. सुमारे तीन तास चाललेल्या या आंदोलनानंतर रस्त्याची दुरुस्ती तातडीने सुरू करण्यात आली असून, येत्या दोन महिन्यांत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर मंजूर केला जाईल, असे आश्वासन कार्यकारी अभियंता ए. बी. चव्हाण यांनी दिले. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून खातगावइसळक रस्त्याचे काम काही महिन्यांपूर्वी सुरू झाले होते, मात्र ते अर्धवट अवस्थेतच थांबले. त्यामुळे नागरिक, शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि दूध उत्पादक यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.



हे काम लवकर पूर्ण करावे, अन्यथा आंदोलन छेडले जाईल, असा इशारा पंचायत समितीचे माजी सभापती रामदास भोर आणि उपसभापती डॉ. दिलीप पवार यांनी दिला होता. त्यानुसार आज ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान कार्यकारी अभियंता चव्हाण यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामस्थांची अडचण लक्षात घेऊन तातडीने दुरुस्ती सुरू करण्याचा निर्णय घेतला. भरावाचे काम सुरू करण्यात आले असून, डांबरीकरणासाठी मंत्रालयीन मंजुरी प्रक्रियेला गती दिली जाणार आहे. या रस्त्याचा वापर खातगाव, टाकळी, हिंगणगाव, कर्जुने खारे आणि निमगाव घाणा परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात करतात. लवकरच या सर्वांची वाहतुकीची अडचण दूर होणार आहे. या प्रसंगी मा. सभापती रामदास भोर, उपसभापती डॉ. दिलीप पवार, प्रकाश कुलट, देविदास कुलट, निलेश सातपुते, सोपान पठारे, नानासाहेब काळे, देवा ढगे, मधुकर सातपुते, कैलास लांडे, दौलत कुलट, श्रीकांत भागवत, नवनाथ ताकपेरे, विष्णु कुलट, रामदास फुले आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विनायकराज प्रतिष्ठानकडून 'किल्ले बनवा' स्पर्धेचे आयोजन

**अहमदनगर । विजय मते**

गुगल फॉर्म भरण्यासाठी खालील QR स्कॅन करा.

सावेडी उपनगरातील प्रभाग क्र. ३ येथे विनायकराज प्रतिष्ठानतर्फे 'किल्ले बनवा स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारून इतिहास आणि संस्कृतीचा वारसा जपण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. आजच्या तरुण पिढीबरोबरच विद्यार्थ्यांना आपल्या इतिहासाची आणि संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आल्याचे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विनय वाखुरे यांनी सांगितले. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून, १५ ते २० ऑक्टोबर या कालावधीत नावनोंदणी करता येईल. किल्ल्यांची पाहणी २१ ते २५ ऑक्टोबर दरम्यान करण्यात येणार आहे. २७ ऑक्टोबर रोजी निकाल जाहीर करून प्रथम, द्वितीय आणि तृतीय विजेत्यांना किल्ल्यांच्या प्रतिकृती असलेल्या ट्रॉफ्या बक्षीस म्हणून देण्यात येतील. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रतिष्ठानच्या वतीने प्रशस्तीपत्रक प्रदान करण्यात येणार आहे. प्रभाग क्र. ३ मधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी होऊन ''इतिहास जपा, संस्कृती जपा प्रत्येक किल्ला सांगतो शौर्य आणि अभिमानाची गाथा'' या संदेशाला साकार करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ८२३७३७७००७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. विनायकराज प्रतिष्ठानतर्फे सावेडी उपनगरात गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, होळी उत्सव अशा विविध प्रसंगी सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम राबविले जातात. विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न प्रतिष्ठान सातत्याने करीत असल्याचे प्रतिष्ठानचे सदस्य विपुल वाखुरे यांनी सांगितले. रयत समाचार

# आकाश कंदील व कार्यशाळा उत्साहात संपन्न

**भिंगार । रयत समाचार**

विश्वशंकर प्राथमिक विद्यालय, भिंगार येथे गुरुवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी आकाश कंदील व पणती रंगविणे कार्यशाळा अत्यंत उत्साहात पार पडली. आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये कलात्मकता आणि भारतीय संस्कृतीचे जतन व्हावे या उद्देशाने या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला श्री. प्रमोद तोरणे साहेब, प्राचार्य तथा सहाय्यक विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग, अहिल्यानगर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

श्री. तोरणे साहेब यांनी विद्यार्थ्यांना दिवाळीचे सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी स्वतः विद्यार्थ्यांना पणत्यांना आकर्षक रंगसंगती कशी द्यावी आणि घरगुती साहित्यातून सुंदर आकाश कंदील कसे तयार करावेत, याचे प्रात्यक्षिक दाखवले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक आणि पारंपरिक पद्धतीने दिवाळी साजरी करण्याचा संदेश दिला. शाळेच्या प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत मोठ्या संख्येने आणि उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. लहानग्यांनी आपल्या कल्पकतेचा वापर करत विविध आकार आणि नक्षीकाम असलेल्या पणत्या तसेच रंगीत कागद व सजावटीच्या वस्तूंपासून आकर्षक आकाश कंदील तयार केले. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि सर्जनशीलता स्पष्टपणे दिसून येत होती. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना या कामात सक्रिय मदत केली. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना अशा प्रकारच्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ कला शिक्षणाचे धडे मिळत नाहीत, तर त्यांना आपल्या पारंपरिक सणांचे आणि मूल्यांचे महत्त्व देखील कळते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या उपक्रमाबद्दल विश्वशंकर प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.नारायण अनभुले व शिक्षकवृंद यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यशाळेमुळे दिवाळीचा उत्साह शाळेत आतापासूनच सुरू झाला आहे.

### ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयाचे पुरस्कार प्रदान

# डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' कथासंग्रहास राज्य पुरस्कार

**शिरुर कासार । रयत समाचार**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठीत राज्यस्तरीय श्रीस्थानक साहित्य पुरस्कार साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' या कथासंग्रहास ठाणे येथे सुप्रसिद्ध साहित्यिक नीरजा आणि महाराष्ट्र राज्य ग्रंथ संचालनालयाचे सहायक संचालक प्रशांत पाटील यांचे हस्ते दि. ५ रोजी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. वि.ल. भावे यांनी एकशे तीस वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या ग्रंथ संग्रहालयाच्या वतीने उत्कृष्ट मराठी साहित्यकृतीसाठी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान केले जातात. डॉ विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' या वास्तववादी कथासंग्रहास सन २०२४ चा मेधा दामोदर रोमण पुरस्कृत पुरस्काराने गौरविण्यात आले. साहित्यिक नीरजा म्हणाल्या की, बदलते वातावरण आपल्या संस्कृतीला मारक आहे. आम्ही सांगतो तेच लिहा ही प्रवृत्ती



घातक आहे. तर जाधव यांनी माणूस माणसाचे प्रश्न हाताळतो. आम्ही जगतो तेच मांडतो असे पुरस्कारास उत्तर देताना म्हटले. पुरस्कार स्वरूप मानपत्र, पाच हजार, ग्रंथभेट देऊन जाधव यांना सन्मानित केले. यावेळी ग्रंथ संग्रहालयाचे अध्यक्ष विद्याधर ठाणेकर, महाराष्ट्र राज्य शासन ग्रंथ निवड समितीचे सदस्य चांगदेव काळे, बबन शिंदे, नागू वीरकर, मोतीराम राठोड, संकेत जाधव यांचेसह राज्यातील लेखक, कवी, रसिक उपस्थित होते.

# 'अशोक' ची पहिली उचल प्रतीटन तीन हजार रुपये- मुरकुटे

**अशोकनगर । शफीक बागवान**



अशोक सहकारी साखर कारखान्यात सन २०२५-२६ च्या गळीत हंगामात येणाऱ्या ऊसासाठी पहिली उचल प्रतीटन रुपये तीन हजार देण्याची घोषणा कारखान्याचे चेअरमन माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी केली. कारखान्याच्या नुकत्याच झालेल्या संचालक मंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. याबाबत मुरकुटे म्हणाले, ''ज्ञानेश्वर कारखान्याने सन २०२५-२६ मध्ये ऊसाला प्रतीटन रुपये तीन हजार ॲडव्हान्स जाहीर केलेला आहे. आम्हीही वार्षिक सर्वसाधारण सभेत, बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ प्रसंगी आणि वेळोवेळी 'अशोक' कारखान्याचा ऊसदर व उचलीचा दर शेजारील ज्ञानेश्वर व मुळा कारखान्यांच्या बरोबरीने ठेवणार आहोत.'' दरम्यान, काही दिवसांपासून अशोक कारखान्याबद्दल सभासदांमध्ये मतमतांतरे असताना, मुरकुटे यांनी इतर कारखान्यांच्या तुलनेत बरोबरीचा उचल जाहीर केल्यामुळे तालुक्यातील ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. रयत समाचार

# श्रीरामपूर नगरपालिकेच्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये सावळा गोंधळ

## आ.ओगले यांनी घेतली निवडणूक आयुक्त वाघमारे यांची भेट

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

सध्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असुन प्रभाग रचनेनंतर जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपरिषदेच्या प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध झाले आहेत. त्या अनुषंगाने श्रीरामपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादी मध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमित झाली असून त्यामध्ये तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात याव्या अशी मागणी आमदार हेमंत ओगले यांनी राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांची मुंबई येथे भेट देऊन केली आहे.

निवडणूक आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्यामध्ये एकाच कुटुंबाचे विभाजन, मयत व दुबार मतदारांचे नाव समाविष्ट होणे, त्याचबरोबर प्रभागांच्या सीमा ओलांडून एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागामध्ये ५०० ते ७०० मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आली आहेत. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करताना बी एल ओ यांनी स्वतः प्रभागांमध्ये जाऊन मतदार यादीवर काम करणे अपेक्षित होते मात्र हे काम प्रत्यक्षात जागेवर जाऊन न केल्याने ही सगळी गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे ही बाब गंभीर स्वरूपाची असून येणाऱ्या निवडणुकांमध्ये याचे विपरीत परिणाम होणार आहेत तसेच हरकतींसाठी देखील कमी कालावधी असल्याचे आमदार ओगले यांनी आयुक्त राज्य निवडणूक आयोग यांच्या निदर्शनास आणून दिले.

यावर राज्य निवडणूक आयोगाने तातडीने सुधारित परिपत्रक काढून प्रारूप मतदार याद्यांवर आता दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती घेता येणार आहे.

तरी मतदारांनी प्रारूप मतदार याद्या तपासून आपल्या नावाची खात्री करून घ्यावी व त्याबाबतच्या हरकती मुख्याधिकारी नगरपरिषद श्रीरामपूर यांच्याकडे दाखल कराव्यात याबाबत काही अडचण आल्यास मला अथवा उपनगराध्यक्ष करण ससाणे यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन आमदार हेमंत ओगले यांनी केले आहे.

दरम्यान शहर काँग्रेसचे अध्यक्ष ण्णासाहेब डावखर यांनी देखील याबाबतची तक्रारी निवडणूक आयोग तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे करुन प्रारूप मतदार याद्या मधला गोंधळ प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. रयत समाचार

# नगर-शिर्डी राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे, धूळीने भाविक व जनता त्रस्त

**नगर । रयत समाचार**

गेल्या दहा वर्षांपासून नागरिक आणि भाविकांच्या संयमाचा अंत पाहत असलेला नगर-शिर्डी राष्ट्रीय महामार्ग आज 'राष्ट्रीय' या शब्दालाही लाजवणारा ठरला आहे. विकासाचा मार्ग म्हणून ओळखला जाणारा हा महामार्ग आज खड्डे, धूळ आणि धोक्यांचा मार्ग बनला असल्याचा आरोप लोकभद्र्यक चळवळीच्या वतीने करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शासनातील भ्रष्टाचार आणि उदासीनतेविरोधात एक आगळेवेगळे आंदोलन उभे करण्यात आले असून, हा रस्ता आता 'लोकमकात्या टक्केवारी राष्ट्रीय महामार्ग' या नावाने ओळखला जाईल, अशी घोषणा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. दररोज हजारो वाहनधारक आणि भाविकांचा जीव या रस्त्यावर धोक्यात असतो. शासनाने चार वेळा ठेकेदार बदलले, अनेकदा मंत्र्यांनी



आश्वासनांची फुले उधळली, परंतु प्रत्यक्षात रस्ता आजही अपूर्णच आहे. 'लोकमकात्या' म्हणजे मला काय त्याचं शासनकर्त्यांचा, मंत्र्यांचा आणि ठेकेदारांचा जनतेच्या दुःखाकडे असलेला निर्लज्ज उदासीन दृष्टिकोन. 'टक्केवारी' म्हणजे भ्रष्टाचाराची ती संस्कृती, जिथे काम प्रामाणिकपणाने नव्हे, तर कमिशन आणि व्यवहाराने चालते. या दोन शब्दांच्या संगमातून उभा राहणारा हा लोकजागृतीचा प्रतीकात्मक महामार्ग असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. साई-सूर्यनामा आंदोलन' हे केवळ आंदोलन नसून आध्यात्मिक आणि नैतिक शुद्धीचा सोहळा असल्याचे संघटनेचे नेते ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले. सूर्यदेवाला सत्य, पारदर्शकता आणि न्यायाचा सनातन साक्षीदार मानून हे आंदोलन राबवले जाणार आहे. हा रस्ता त्या सत्ताधाऱ्यांच्या अपयशाचा पुरावा आहे, ज्यांनी आपल्या कर्तव्याचा विश्वासघात केला. लोकशाही आता लोकभद्र्यकशाहीत रूपांतरित व्हावी, जीलोकभक्ती (जनसेवा),ज्ञानभक्ती (सत्यजागर) आणि कर्मभक्ती (निष्काम कृती) या त्रिसूत्रीवर उभी राहील, अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे. नगर-शिर्डी महामार्ग जो आज भ्रष्टाचाराचे प्रतीक ठरला आहे, तोच आता जनतेच्या चेतनेचा दीपस्तंभ बनत आहे. 'लोकमकात्या टक्केवारी महामार्ग' या नावाने जनता शासनाला आरसा दाखवत आहे. प्रत्येक खड्डा आज शासनाच्या अपूर्ण वचनांचे स्मारक ठरत आहे. ''सत्य कधीही भ्रष्टाचाराच्या सावलीत कायम लपून राहू शकत नाही,'' असा इशारा देत लोकभद्र्यक चळवळीचा हा जनआक्रोश आंदोलन शासनाला सत्याचाराच्या दिशेने प्रवृत्त करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या आंदोलनासाठी ॲड. कारभारी गवळी, ॲड. संजय जव्हेरी, अशोक सब्बन, अशोक भोसले, शाहीर कान्हू सुंबे, जालिंदर बोरुडे, प्रकाश थोरात आणि वीरबहादूर प्रजापती हे प्रयत्नशील आहेत.